मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मालमत्ता बिल वाटपासाठी 'सिद्धी'

## महिला आर्थिक विकास महामंडळातील बचतगट सदस्यांकडे जबाबदारी




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने गतवर्षीप्रमाणेच 2024-25 या आर्थिक वर्षात महिला बचत गटातील महिलांमार्फत मालमत्ता कराची बिले वाटपासाठी सिध्दी 2.0 हा प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे. गतवर्षी हा प्रकल्प यशस्वी झाल्यामुळेच पहिल्या तीन महिन्यात 50 टक्के मालमत्ता कर वसूल झाला होता. बचत गटातील महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा महापालिकेचा अतिशय स्तुत्य असा उपक्रम हाती घेतला आहे.

शहरात 6 लाख 25 हजार निवासी, व्यावसायिक, औद्योगिकसह इतर मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांना महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने कराची आकारणी केली जाते. गतवर्षी या मालमत्ता धारकांना महिला बचत गटाच्या माध्यातून घरोघरी बिले पोच करण्याचा महत्वाचा निर्णय महापालिकेने घेतला होता. अवघ्या दिड महिन्यात पालिकेच्या इतिहासात प्रथमच 100 टक्के मालमत्ता धारकांना बिले घरपोच मिळाली होती. त्यामुळे आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतच मालमत्ता धारकांनी विविध कर सवलतींचा लाभ घेवून 447 कोटी रूपये म्हणजे 50 टक्के मालमत्ता कर वसूल करण्यात या विभागाला यश आले होते.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या महिलांवर महापालिकेने टाकलेला विश्वास गतवर्षी सार्थ ठरविल्यामुळे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी पुन्हा एकदा मालमत्ता कराच्या बिलांचे वाटप बचत गटातील महिलांकडे सोपविण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पाला सिध्दी 2.0 प्रकल्प असे नाव देण्यात आलेले आहे. या प्रकल्पाचे समन्वयन व पर्यवेक्षण राज्य शासन अंगीकृत महिला आर्थिक विकास महामंडळाकडे सोपविण्यात आले आहे.

### बचत गटातील महिलांना प्रशिक्षण

मालमत्ता करांची बिले वाटपासंदर्भात महिलांना कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात 2 एप्रिल रोजी प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी कर संकलन विभागाचे सर्व प्रशासन अधिकारी, सहायक मंडल अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या प्रशिक्षणामध्ये महिलांना मालमत्ता कराविषयी मुलभूत माहिती, बिल नेमके कसे असते, बिलांमध्ये कोण-कोणत्या बाबींचा समावेश असतो, याची इत्भुंत माहिती देण्यात आली. सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी गतवर्षी राबविलेल्या उपक्रमाचे झालेले फायदे, आलेल्या अडचणी या संदर्भात मार्गदर्शन केले. गतवर्षीच्या अडचणी पुन्हा येऊ नये, यासाठी काय उपाय योजना करण्यात येत आहेत, याचीही चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर प्रत्येक महिलेला दोन हजारपेक्षा जास्त बिले वाटपाचे काम देण्यात येणार नाही. जेणेकरून सर्व महिलांना बिल वाटपाचे मानधनाची रक्कम समान मिळेल.

### एका बिलासाठी महिलांना मिळणार 20 रूपये

मालमत्ता कराचे बिल वाटण्यासाठी महापालिकेच्या वतीने महिलांना गतवर्षी एका बिलासाठी 15 रूपये देण्यात आले होते. मात्र, यंदा यामध्ये वाढ करून प्रत्येक बिलासाठी 20 रूपये देण्यात येणार आहेत. यावर्षी देखील सिध्दी ॲपच्या माध्यमातून काम करण्यात येणार आहे. यावेळचे सिध्दी ॲप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. महिलांनी मालमत्तेचा मोबाईल क्रमांक हा एसएमएस पाठविण्याच्या दृष्टीने व सर्व सेवा ऑनलाइन मिळण्यासाठी अत्यंत महत्वाचा आहे. पालिकेच्या सर्व सेवा ओटीपी बेस असल्यामुळे मालमत्ता धारकाने आपला अचूक मोबाईल नंबर देणे आवश्यक आहे. त्यामुळे यंदा ॲपमधून प्रत्येक मालमत्तेचा मोबाईल क्रमांक ओटीपीव्दारे शहानिशा केला जाणार आहे. त्यामुळे जास्तीत-जास्त मोबाईल क्रमांक मिळण्यास आणि नागरिकांचा व्यक्तिगत डेटा सुरक्षित ठेवण्यास मदत होणार आहे. यंदाही पहिल्या तिमाहीत पाचशे ते साडे पाचशे कोटी रूपयांपर्यंत मालमत्ता कर वसूल होईल, अशी आशा सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी व्यक्त केली आहे.

### बिलांचे वाटप दिड महिन्यात पूर्ण होणार

गतवर्षी कर संकलन विभागाने पालिकेच्या इतिहासातील 977 कोटी 50 लाख रूपयांचा कर वसूल केला आहे. आगामी वर्षात नवीन उच्चांक गाठण्यासाठी 2024-25 च्या आर्थिक वर्षाला सुरूवात होताच सहायक आयुक्त नीलेश देशमुख आणि त्यांची टीम कार्यरत झाली आहे. त्यानुसार मालमत्तेची कोरी बिले ही छपाईसाठी गेली असून ती बिले 10 एप्रिलपर्यंत कर संकलन विभागाला मिळणार आहेत. दि. 10 ते 15 एप्रिल या कालावधीत दोन-दोन हजार बिलांचे गठ्ठे करण्यात येणार आहेत. त्यानंतर ती बिले बचत गटातील महिलांकडे सुपूर्द केली जाणार आहेत. बिलांचे वाटप दि. 15 एप्रिल ते 31 मे या कालावधीत करण्यात येणार आहे.

> गतवर्षी सिध्दी प्रकल्पाचा महापालिकेला मोठ्या प्रमाणात फायदा झाला आहे. गतवर्षी तब्बल साडेतीनशेपेक्षा जास्त महिलांना अवघ्या दिड महिन्यामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळाला. बचत गटातील महिलांना पारंपारिक क्षेत्रे सोडून हे एक रोजगाराचे नवे दालन पालिकेने खुले केले. यंदाही आम्ही सिध्दी 2.0 प्रकल्प राबविणार आहोत. या प्रकल्पाच्या माध्यमातून ॲपमध्ये मालमत्ता धारकाचा मोबाईल क्रमांक पडताळण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे बिल दिल्यानंतर नागरिकांचा मोबाईल क्रमांक ॲपमध्ये टाकल्यानंतर एक ओटीपी संबंधित मालमत्ता धारकांना जाईल. तो ओटीपी ॲपमध्ये टाकल्यानंतर तो मोबाईल क्रमांक व्हेरिफाय होईल. त्यामुळे पालिकेच्या डेटाबेसमध्ये सध्या अनेक मोबाईल क्रमांक हे चुकीचे आहेत किंवा क्रमांकच नाहीत. हा सर्व प्रकार बंद होईल. त्याचबरोबर नागरिकांना महापालिकेच्या सर्व ऑनलाइन सेवा ओटीपी बेस मिळणार आहेत. सेवेमध्ये तत्परता, पारदर्शकता वाढेल. नागरिकांची व्यक्तिगत माहिती सुरक्षित राहण्यास मदत होईल. नागरिकांनी मोबाईल क्रमांकाची पडताळणी करावी.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# कोल्हेंना भावनिक राजकारण करावं लागतंय

## कोल्हेंनी विकासकामं केली नाहीत, आढळराव पाटील यांची प्रतिक्रिया

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर लोकसभा मतदारसंघाकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष असणार आहे. कारण बारामतीप्रमाणे शिरूरमध्येही 'पवार विरुद्ध पवार' अशी लढत पाहायला मिळणार आहे. शिरूर येथून महायुतीतून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने शिवाजीराव अढळराव पाटील यांना उमेदवारी दिली आहे. तर महाविकास आघाडीतून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अमोल कोल्हे मैदानात असतील.



मात्र शिरूरचे विद्यमान खासदार अमोल कोल्हे एकदा निवडून गेल्यानंतर पुन्हा मतदारसंघात फिरकलेच नसल्यामुळे नागरिक नाराज आहेत. याचमुळे अमोल कोल्हे भावनिक राजकारण करत असल्याचे चित्र आहे. यावर कोल्हेंचे विरोधी उमेदवार आढळराव पाटलांनी मोठी प्रतिक्रिया दिली आहे.

अलीकडेच माध्यमांशी संवाद साधताना आढळराव पाटलांना अमोल कोल्हेंना भावनिक राजकारण का करावं लागतंय? असा प्रश्न विचारण्यात आला. याचे उत्तर देताना आढळराव पाटील म्हणाले की, "कोल्हेंनी विकासकामं केली नाहीत. त्यांना विजयाची खात्री नाही. यापूर्वी कोल्हे जेव्हा उमेदवार म्हणून शिरूरमध्ये यायचे, तेव्हा लोक सन्मामाने डोक्यावर पदर घेऊन रांगा लावायचे. कारण संभाजी महाराज म्हणून लोकांमध्ये त्यांची प्रतिमा होती. मात्र आता त्यांना घरोघरी जाऊन ४-५ लोकांसमोर भाषण द्यावे लागत आहे. काल मी पाहिलं, आमचा ग्रामीण दौरा होता. एका घरामध्ये हॉलमध्ये फक्त ७-८ लोक होते, त्यांच्यापुढे त्यांनी अर्धा तास भाषण दिलं. अशी परिस्थिती आहे. त्यामुळे त्यांना भावनिक राजकारण करणं साहजिक आहे", असेही आढळराव पाटलांनी म्हटलं.

### धाकल्या धन्याचं नाव घेऊन पैसे कमावतात

कोल्हे धाकल्या धन्याचं नाव घेऊन पैसे कमावतात हे त्यांना शोभत नाही. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज हे आमच्या जिव्हाळ्याचे आहेत. आमचे आदराचे स्थान आहेत. कोल्हे उगाच बोलून व्यापारासाठी, धंद्यासाठी निवडणुकीसाठी उपयोग करू नका, असा सल्लाही आढळराव पाटील यांनी दिला आहे.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनेचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील आणि अमोल कोल्हे यांच्यात तगडी लढत झाली होती. उद्धव ठाकरे यांचे निकटवर्तीय आणि शिवसेनेचे वरिष्ठ नेते तसेच जाणते राजकारणी अशी ओळख असलेल्या आढळराव पाटील यांना राजकारणात नवख्या असणाऱ्या अमोल कोल्हे यांनी पराभूत केलं होतं.

आढळराव पाटील यांचा पराभव करत अमोल कोल्हे यांनी विजय खेचून आणली. आता आढळराव पाटील जर अजित पवार गटासोबत गेले, तर पुन्हा या दोघांमध्ये तगडी लढत होण्याची शक्यता आहे.

सध्या डॉ. अमोल कोल्हे आणि शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यात आरोप-प्रत्यारोप रंगला आहे.

शिरूर लोकसभा मतदारसंघाला काम करणारा खासदार हवा आहे, कोल्हे यांच्यात हिंमत असेल तर त्यांनी त्या खासदारांचे नाव जाहीर करावे, असं खुलं आव्हान शिंदे गटाचे ज्येष्ठ नेते शिवाजी आढळराव पाटलांनी दिलंय.

### मतदारसंघाला काम करणारा खासदार हवा...

आढळराव पाटील म्हणाले, खासदार अमोल कोल्हे यांच्यात हिंमत असेल तर त्यांनी त्या खासदारांचे नाव जाहीर करावे. कोल्हे हे फिल्मी डायलॉगबाजी करणारे खासदार आहेत. शिरूर लोकसभा मतदारसंघाला काम करणारा खासदार हवा आहे. फिल्मी डायलॉगबाजी करणारा अभिनेता नको आहे. आढळराव म्हणाले, स्वराज्य रक्षक संभाजी मालिकेसाठी अनेकांचे उंबरे त्यांनी झिजवले. पण, त्यावेळच्या एका खासदारांनी कोल्हेंना विकले तरी पैसे फिटणार नाहीत, या वक्तव्याचा कोल्हे यांनी ऐन लोकसभेच्या तोंडावर पुन्हा एकदा वक्तव्य केलंय. यालाच उत्तर देताना महायुतीकडून कोल्हे यांच्या विरोधात निवडणूक लढण्यास इच्छुक असणाऱ्या आढळराव पाटलांनी कोल्हेंना खुलं आव्हान दिलं आहे.

# बांधकामेही पिताहेत पिण्याचे पाणी, निकषांचे अडथळे

## बांधकामांसाठी प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरणे बंधनकारक

**पुणे | प्रतिनिधी**

प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर बांधकामांसाठी करणे पुणे महापालिकेने बंधनकारक केले असले, तरी बांधकाम करताना व्यावसायिकांना विविध टप्प्यांवर नियमानुसार पिण्याच्या पाण्याचाच वापर करावा लागतो आहे. एकूण वापरात पुनर्प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर केवळ ३० ते ३५ टक्के करणेच शक्य आहे. ते पाणीही वेळेवर उपलब्ध होत नसल्याने त्याचा वापर करणे बांधकाम व्यावसायिकांसाठी अडचणीचे ठरत आहे.



बांधकामांसाठी पिण्याच्या पाण्याऐवजी प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरणे महापालिकेने बंधनकारक केले आहे. १० जानेवारी २०२२ पासून या निर्णयाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. मात्र, गेल्या सव्वादोन वर्षांत या प्रकारचे पाणी वापरण्यास बांधकाम व्यावसायिकांकडून टाळाटाळ केली जात आहे. त्यामुळे शहरातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता बांधकामे थांबविण्याचा इशारा महापालिका आयुक्त आणि प्रशासक डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिला आहे.

या पार्श्वभूमीवर, महापालिकेने आतापर्यंत प्रक्रिया केलेले पाणी, त्याचा वापर आणि बांधकाम व्यावसायिकांकडून प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरण्यास होत असलेली टाळाटाळ यांमागील कारणांचा शोध घेतला.

महापालिकेने १० जानेवारी २०२२ पासून प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरण्याची सूचना केली. तेव्हापासून ३१ मार्च २०२४ अखेरपर्यंत महापालिकेने आठ प्रकल्पांतून ३१ हजार ९४७ टँकर्स उपलब्ध करून दिले. दहा हजार लिटर क्षमतेचा एक टँकर, यानुसार ३१९.४७ दशलक्ष लिटर पाणी देण्यात आले आहे.

प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर ज्या टप्प्यावर आवश्यक असतो, त्या टप्प्यावर पाणी मिळण्याची हमी महापालिकेकडून मिळाल्यास बांधकाम व्यावसायिक नक्कीच या पाण्याचा वापर करतील.

### 450 दशलक्ष लिटर पाण्यावर प्रक्रिया...

» महापालिकेचे एकूण दहा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आहेत. यातील एका प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे. त्यामुळे त्यातून सांडपाण्यावर प्रक्रिया होत नाही, तर नरवीर तानाजीवाडी येथील प्रकल्पाकडे जाणारे रस्ते अरुंद आहेत. त्यामुळे त्याचाही फारसा वापर होत नाही. नवीन नायडू, बाणेर, बोपोडी, मुंढवा, खराडी, विठ्ठलवाडी, एरंडवणे, भैरोबानाला या आठ प्रकल्पांतून दिवसाला सरासरी ४५० दशलक्ष लिटर पाण्यावर प्रक्रिया केली जाते. या सर्व प्रकल्पांची क्षमता यापूर्वी ४७७ दशलक्ष लिटर एवढी होती ती वाढवून ५६७ दशलक्ष लिटर एवढी झाली आहे.

# आचारसंहितेचा भंग होऊ देऊ नका

## मेट्रोच्या खांबावर राजकीय जाहिरातबाजी : महापालिकेने टोचले मेट्रोचे कान

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीत पिंपरी ते हॅरिस ब्रिज यादरम्यान महामेट्रो धावते. या मेट्रो मार्गातील मेट्रोच्या खांबावर नेहमीच राजकीय पक्ष, नेते, पदाधिकारी विविध राजकीय जाहिरातबाजी करतात. यावर महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाकडून सातत्याने कारवाई करण्यात येते. मात्र, सध्या राज्यात आचारसंहिता लागू असल्याने या जाहिरातींच्या माध्यमातून आचारसंहितेचा भंग होऊ यासाठी महापालिकेने पत्र पाठवत महामेट्रो प्रशासनाचे काम टोचले आहेत.

मेट्रोचे खांब तुमच्या मालकीचे असून यावर आचारसंहितेचा भंग होईल, अशी कोणतीही जाहिरातबाजी होऊ देऊ नका, जाहिरातबाजी झाल्यास तत्काळ कारवाई करा, असे या पत्रात नमूद करण्यात आले आहे. देशासह राज्यात मोठ्या प्रमाणात निवडणुकीचे वातावरण तापले आहे. सर्वच पक्षांचे उमेदवार प्रचारात दंग झाले आहे. सभा, बैठका, दौरे, भेटीगाठींनी मोठा वेग आला आहे. अनेकदा प्रचार करताना राजकीय लोकांकडून आचारसंहितेचा भंग होण्याची शक्यता असते. त्या संदर्भातील तक्रारीही निवडणूक विभागाकडे केल्या जातात. त्यामुळे महापालिका हद्दीत आचारसंहितेचा कोठेही आणि कोणत्याही प्रकारे भंग होऊ नये, यासाठी सर्वच प्रशासन काळजी घेत असते.

महापालिका हद्दीत मोठ्या प्रमाणात बोर्डिंग, फ्लेक्सद्वारे जाहिरातबाजी होत असते. आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत यावर लक्ष ठेवले जाते. जाहिरातींना परवानगी देणे, अनधिकृत जाहिरातींवर कारवाई करणे, हे काम या विभागाकडून केले जाते. दरम्यान, महापालिकेच्या हद्दीत पिंपरी ते हॅरिस ब्रीज या दरम्यान मेट्रो धावते. या मेट्रोच्या खांबावरील अनेकदा जाहिरात केली जाते. या जाहिरातींवर आकाशचिन्ह विभागाकडून वारंवार कारवाई करण्यात आली आहे. मात्र, सध्या आचारसंहिता लागू असल्याने काही जाहिरातींच्या माध्यमातून आचारसंहितेचा भंग होण्याची शक्यता आहे. शहरातील अनेक राजकीय व्यक्तींकडून मेट्रोच्या खांबांवर कायम जाहिरातबाजी




केली जाते. यावर आकाशचिन्ह विभागाकडून कारवाईही होत असते. मात्र, असे प्रकार वारंवार होऊ नये यासाठी आकाशचिन्ह विभागाने थेट महामेट्रोला पत्र दिले आहे.

मेट्रोचे काम हे महा मेट्रोच्या मालकीचे आहेत. त्यावरील जाहिरातींची सर्व जबाबदारी ही महा मेट्रोचे आहे. आचारसंहितेच्या काळात या जाहिरातींच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारे आचारसंहितेचा भंग होणार नाही याची काळजी महामेट्रोने घ्यावी. संबंधित जाहिरातदारांवर योग्य ती कारवाई करावी, असे या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

> महापालिका हद्दीत पिंपरी ते हॅरिस ब्रीज या दरम्यान मेट्रो धावते. या मेट्रोच्या खांबांवर अनेकदा राजकीय जाहिराती लावल्या जातात. त्यामुळे सध्या आचारसंहितेचा भंग होऊ शकतो. हा प्रकार टाळण्यासाठी महामेट्रोला पत्र दिले आहे.
>
> **- संदीप खोत, उपायुक्त, आकाशचिन्ह व परवाना विभाग**

# पिंपरी मतदार संघात 6 मतदान केंद्र संवेदनशील

## मावळ लोकसभा मतदार संघात 14 संवेदनशील केंद्रावर 'वॉच'

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघात २५ लाख ९ हजार ४६१ मतदार असून, दोन हजार ५५६ मतदान केंद्रे आहेत. त्यापैकी १४ मतदान केंद्र हे संवेदनशील आहेत. सर्वाधिक सहा संवेदनशील मतदान केंद्र पिंपरी विधानसभेतील आहेत. संवेदनशील केंद्रांवर निवडणूक विभागासह पोलीस यंत्रणेचे विशेष लक्ष असणार आहे. त्यादृष्टीने उपाययोजना करण्यात येणार आहेत.

मावळ लोकसभेतील पनवेल विधानसभा मतदारसंघात ५३८ पैकी तीन मतदान केंद्र हे संवेदनशील आहेत. कर्जत मतदारसंघात ३३९ आणि उरण मतदारसंघात ३४० मतदान केंद्र आहेत. त्या दोन्ही मतदारसंघात एकही केंद्र संवेदनशील नाही. मावळ विधानसभा मतदारसंघात ३९० पैकी केवळ एक केंद्र संवेदनशील आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक ५४९ मतदान केंद्र आहेत. त्यापैकी चार केंद्र हे संवेदनशील आहेत. तर, पिंपरी विधानसभेत ४०० मतदान केंद्र आहेत. त्यापैकी सर्वाधिक सहा मतदान केंद्र हे संवेदनशील आहेत. संवेनदशील मतदान




केंद्रांवर विशेष लक्ष दिले जाते. त्या केंद्रांवर स्वतंत्र निरीक्षक नेमला जातो. त्या केंद्रावरील मतदानावर 'सीसीटीव्ही' कॅमेरे लावून ऑनलाइन प्रक्षेपण केले जाते. तसेच, एक सूक्ष्म निरीक्षक, केंद्रीय पोलीस दलातील एक कर्मचारी तैनात केला जातो.

### संवेदनशील मतदान केंद्र ठरविण्याची पद्धत

ज्या मतदान केंद्रातील एखाद्या घटनेमुळे पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. त्यात मतदान केंद्र बळकावणे, बोगस मतदानाचे प्रमाण अधिक असणे, दादागिरी करणे, भांडणे होणे, शिवीगाळ करणे आदी प्रकार होणे. केंद्रावर एकाच उमेदवाराला ७५ टक्के मतदान झाले असल्यास, झालेल्या मतदानांपैकी ९० टक्के मतदान एकाच उमेदवाराला झाले असल्यास तसेच एका कुटुंबातील सदस्यांची नावे मतदार यादीत सलग एकाच मतदान केंद्रावर नसणे अशा मतदान केंद्रांना संवेदनशील केंद्र म्हणून घोषित केले जाते.

> निवडणूक आयोगाच्या निकषानुसार संवेदनशील मतदान केंद्रांवर उपाययोजना करून अंमलबजावणी केली जाईल. त्यानुसार १४ मतदान केंद्राचे ऑनलाइन प्रक्षेपण, एक सूक्ष्म निरीक्षक, एक अतिरिक्त पोलीस तैनात केला जाणार आहे. विठ्ठल जोशी, निवडणूक निर्णय अधिकारी.
>
> **- विठ्ठल जोशी, निवडणूक निर्णय अधिकारी.**

# निघोजे बंधाऱ्याला गळती, गावांत पाण्याचा प्रश्न

## 40 एमएलडी पाण्याची तूट निर्माण झाल्याने समाविष्ट गावातील पाणीपुरवठा विस्कळीत

**पुणे | प्रतिनिधी**

इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्याला गळती लागली असून ४० एमएलडी पाण्याची तूट निर्माण झाल्याने समाविष्ट गावातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे.

इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्याला गळती लागली असून, आंद्रा धरणातून मिळणाऱ्या पाण्यात पुन्हा घट झाली आहे. धरणातून अवघे ४५ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी शहरासाठी मिळत आहे. ४० एमएलडी पाण्याची तूट निर्माण झाल्याने समाविष्ट गावातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे.

महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर ऑनलाइन बैठक झाली. यामध्ये पाणी पुरवठा सुरळीत करण्यासह निघोजे बंधाऱ्यातून पाण्याची गळती रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची सूचना पाटबंधारे विभागाला केली. शहराला गेल्या सव्वाचार वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. शहरासाठी आंद्रा धरणातून शंभर एमएलडी पाणी राखीव आहे. मावळातील पवना धरणातून ५१०, आंद्रा धरणातून पहिल्या टप्प्यात ८५, तर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी)कडून २० असे ६१५ एमएलडी पाणी शहराला देण्यात येते.

आंद्रा धरणातील पाणी इंद्रायणी नदीत सोडून निघोजे बंधाऱ्यातून दोन पंपाद्वारे उचलले जाते. त्यावर चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया केली जाते. तेथे प्रक्रिया झाल्यानंतर जलवाहिन्यांद्वारे पाणी शहराला वितरित केले जात आहे. मात्र, गेल्या दोन दिवसांपासून आंद्रा धरणातून ४५ एमएलडीच पाणी मिळत आहे.

त्यामुळे ४० एमएलडी पाण्याची तूट निर्माण झाली आहे. आंद्रा धरणातून पाणी कमी येत असल्याबाबत पालिकेच्या अधिकाऱ्यांनी पाटबंधारे विभागाशी संपर्क साधून ऑनलाइन बैठक घेतली. आंद्रा धरणातून पुरेसे पाणी इंद्रायणी नदीत सोडावे, निघोजे येथील बंधाऱ्याची तत्काळ दुरुस्ती करावी, अशा सूचना पालिकेच्या वतीने करण्यात आल्या. निघोजे बंधाऱ्यात पाण्याचा पुरेसा साठा होत नसल्याने दोन पंपांऐवजी एकाच पंपाव्दारे पाणी उपसा केला जात आहे.



शहराला गेल्या सव्वा चार वर्षांपासून एक दिवसाआड पाणी पुरवठा सुरू आहे. मावळातील पवना धरणातून ५१०, आंद्रा धरणातून पहिल्या टप्प्यात ८५ तर एमआयडीसीकडून २० असे ६१५ एमएलडी पाणी शहराला देण्यात येते. आंद्रा धरणातील पाणी इंद्रायणी नदीत सोडून निघोजे बंधाऱ्यातून दोन पंपाद्वारे उचलून ते चिखली जलशुद्धीकरण केंद्रात आणले जाते. तिथे प्रक्रिया झाल्यानंतर जलवाहिन्यांद्वारे पाणी शहराला वितरित केले जात आहे. मात्र, गेल्या दोन दिवसांपासून आंद्रा धरणातून ४५ एमएलडीच पाणी मिळत आहे. त्यामुळे साधारण ४० एमएलडी पाण्याची तूट निर्माण झाली आहे. तसे च मार्चमध्येही १५ दिवस पाण्याची अशीच समस्या निर्माण झाल्याने महापालिकेने एमआयडीसीकडून घेण्यात येणारे पाणी वाढविले होते.

### बंधाऱ्याच्या दुरुस्तीला आचारसंहितेचा अडसर

» निघोजे बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याची मागणी पालिकेकडून पाटबंधारे विभागाकडे केली होती. या बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. आचारसंहिता संपल्यानंतर निविदा प्रक्रिया राबवून दुरुस्ती केली जाईल, असे पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. शहरासाठी आंद्रा धरणातून शंभर एमएलडी पाणी राखीव आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्यात पुरेसे पाणी येत नाही. पाणी गळती रोखण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या असल्याचे पाणी पुरवठा विभागाचे मुख्य अभियंता श्रीकांत सवणे यांनी सांगितले.

# पुण्यासह महाराष्ट्रात तापमानात मोठी वाढ

## राज्यात पुढील 15 दिवस उष्णतेची लाट कायम राहणार, पुणे वेध शाळेचा अंदाज

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यात पुढील १५ दिवस उष्णतेची लाट कायम राहणार आहे. पुण्यासह मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या तापमानात मोठी वाढ होण्याचा अंदाज पुणे वेध शाळेने वर्तविला आहे.

एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अंगाची लाही लाही होत आहे. तापमानामध्ये प्रचंड वाढ झाली आहे. आता राज्यात पुढील १५ दिवस उष्णतेची लाट पुण्यासह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये कायम राहणार आहे. पुढील काही दिवसांत मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यामध्ये असणाऱ्या जिल्ह्यांमध्ये तापमानात मोठी वाढ होईल, असा अंदाज पुणे वेधशाळेने वर्तविला आहे.

येणारा काळ हा निवडणुकीचा आहे. त्यामुळे या काळात मतदार, पक्षाचे अनेक लोकं कार्यक्रमांमध्ये सहभागी होतील. त्यांनी देखील काळजी घेण्याची आवश्यकता आहे. सकाळी १० ते दुपार ३ पर्यंत उन्हाचा तीव्र तडाखा जाणवणार आहे. त्यामुळे जर काही अत्यंत महत्वाचे असेल तरच बाहेर पडा, अन्यथा बाहेर पडणं टाळा, असं आवाहन पुणे वेध शाळेचे प्रमुख के. एस. होसाळीकर यांनी केलं आहे. एप्रिल महिन्यात आणि मे महिन्यात तापमान कसं राहील? या संदर्भात के. एस. होसाळीकर यांच्याशी प्रतिनिधींनी संवाद साधला. तेव्हा त्यांनी त्यांची प्रतिक्रिया दिली आहे.

एप्रिल महिन्याच्या सुरूवातीलाच राज्यात उन्हाचा ताप वाढू लागली आहे. मालेगाव, विदर्भातील ब्रह्मपुरी, मध्य महाराष्ट्रातील जेऊर आणि सोलापूर या शहरांमध्ये तापमानाचा पारा ४२ अंशांच्या वर गेला आहे. आता राज्यात पंधरा दिवस उष्णतेच्या लाटेची शक्यता वर्तविली आहे.




### हवेचा कमी दाबाचा पट्टा ..

मराठवाडा, पूर्व विदर्भ, कर्नाटक, दक्षिण तमिळनाडूपर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा कायम असणार आहे. राज्यात निरभ्र आकाश आहे. दिवसा उन्हाच्या झळा नागरिकांना असह्य होत आहेत. दोन दिवसांपूर्वी रात्रीवेळी उष्ण लाटेचा इशारा देण्यात आला होता. दिवसा मोठ्या प्रमाणात उकाडा जाणवत आहे. सकाळपासूनच उन्हाचा चटका वाढत आहे. दुपारी घराबाहेर पडणं तापदायक ठरत आहे. पुण्यात पुढील सहा दिवस आकाश मुख्यतः निरभ्र राहून किंवा संध्याकाळी आकाश अंशतः ढगाळ राहील 9 तारखेला आकाश अंशतः ढगाळ राहून हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. वातावरणातील खालच्या थरातील वाऱ्यांमुळे पुढील दोन दिवस राज्यात सर्वत्र हवामान कोरडे राहील

५ एप्रिलपासून राज्यामध्ये पावसाला पोषक हवामान तयार होण्याचा, हवामान विभागाचा अंदाज आहे. अनेक शहरांमध्ये तापमान ४२ अंशापेक्षा जास्त आहे. त्यामुळे नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी, असं आवाहन पुणे वेध शाळेकडून करण्यात आलं आहे. राज्यात पुढील १५ दिवस उष्णतेची लाट कायम राहणार आहे. पुण्यासह मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या तापमानात मोठी वाढ होण्याचा अंदाज पुणे वेध शाळेने वर्तविला आहे.

मध्य महाराष्ट्रात 8 एप्रिल मराठवाड्यात 6 ते 9 एप्रिल विदर्भात, 9 एप्रिल कोकण गोव्यात हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे 7 एप्रिलला मध्य महाराष्ट्रात विदर्भात ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.